# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०


◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 764
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 17 JUL 2021

## परिपत्रक क्रमांक - ३७

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य /प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना कळविणेत येते की, माहे जुलै/ऑगस्ट, २०२१ (Event - March/April-2021) मध्ये होणा-या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया ज्या त्या महाविद्यालय स्तरावर करण्यात आली असून सदरील विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची माहिती आणि सदरील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क जमा केल्याचा तपशिल इत्यादी माहिती प्रस्तुत विद्यापीठाकडे ठरवून दिलेल्या मुदतीमध्ये जमा करणे आवश्यक असताना देखील काही महाविद्यालयांनी परीक्षा अर्ज आणि परीक्षा शुल्काबाबतची माहिती प्रस्तुत विद्यापीठाकडे सादर केली नसल्याची बाब निर्दशनास आली असून ही अतिशय गंभीर स्वरुपाची आहे.

सदरील माहिती विद्यापीठास प्राप्त न झाल्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याच्या परीक्षेच्या संदर्भात काही अडचण निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ज्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहिल, याची दक्षता घ्यावी. विलंब शुल्क आणि अति विलंब शुल्क भरुन ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत. अशा विद्यार्थ्यांची माहिती देखील विद्यापीठास प्रत्यक्ष येऊन दाखल करणे आवश्यक असताना काही महाविद्यालयांनी सदरील माहिती ही ई-मेलव्दारे विद्यापीठास कळविले असल्याचे दिसून आले आहे.

वर नमूद केलेल्या दोन परिच्छेदामधील वस्तुस्थितीप्रमाणे ज्या महाविद्यालयांनी परीक्षा अर्जाच्या संदर्भातील माहिती प्रस्तुत विद्यापीठास प्रत्यक्ष हजर राहून सादर केली नाही, अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संदर्भात परीक्षेच्या वेळी अगर त्यानंतर काही अडचण निर्माण झाल्यास त्यांची सर्व जबाबदारी ज्या त्या महाविद्यालयावर राहिल, याची नोंद घ्यावी.

( डॉ. विकास कदम )
प्र संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१) प्राचार्य, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर २) प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातील संगणक विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

Scanned by CamScanner